719

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
दूरध्वनी: (०२२) २७५७२७८७.
ईमेल : estt6mjp@gmail.com

जा.क्र.मजीप्रा-२०२५/प्र.क्र.३५/आस्था-६/ दिनांक :-२७/०२/२०२६
रजिस्टर पोस्टाने

स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०२३ च्या प्रक्रियेअंती निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) गट-ब या पदावर सरळसेवेने तात्पुरती नियुक्ती देणेबाबत.

## कार्यालयीन आदेश

**वाचा :-**

१ सामान्य प्रशासन विभाग, अधिसुचना क्रमांक एसआरव्ही २०१६/प्र.क्र.२८१/ बारा, दिनांक २१ जून, २०२१

२ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.मजीप्रा/ प्र.क्र.२४७ (भाग-१)/पापु-२३, दिनांक १८ जून, २०२४

३ महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचे पत्र दिनांक १८.७.२०२५

४ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.मजीप्रा-११२१/ प्र.क्र.५३/ पापु-२३, दि.३१ जुलै, २०२५

५ मध्यवर्ती कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दिनांक १२ सप्टेंबर, २०२५

| म.जी.प्रा. नवी मुंबई | |
|---|---|
| उप अभियंता | |
| शाखा | आय.टी. सेल |
| आवक क्र. | |
| दिनांक:- | |

Recd 8/3/26

महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०२३ या परिक्षेतील सहाय्यक अभियंता श्रेणी-२ संवर्गाच्या ४९ पदांसाठी दिनांक २८.१.२०२४ रोजी घेण्यात आलेल्या परिक्षेचा निकाल दिनांक १७.७.२०२५ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केला आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दि.१८.७.२०२५ च्या पत्रान्वये पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना ४९ उमेदवारांची शिफारस करण्यात आली. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी संदर्भ क्र.४ येथील दि.३१.७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर ४९ उमेदवारांची शिफारस प्राधिकरणास कळविली आहे.

उपरोक्त ४९ शिफारसप्राप्त उमेदवारांपैकी श्री.दिनेश उध्दव भोसले यांनी दि.१७.१२.२०२५ रोजीच्या ईमेलद्वारे, श्री.भालचंद्र नारायण हरगिले यांनी दि.१८.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, श्रीमती पुजा विजय पाडवी यांनी दि.१९.१२.२०२५ च्या पत्रान्वये व श्री.आकाश गुलाब राठोड यांनी दि.२७.१.२०२६ च्या पत्रान्वये नियुक्ती करीता इच्छुक नसल्याबाबत प्राधिकरणास कळविले आहे.

माने - Publish करा.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या ४९ उमेदवारांपैकी उपरोक्त ४ उमेदवारांना वगळून सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मधील सद्यस्थितीत नियुक्तीस पात्र ठरलेल्या ४५ उमेदवारांना सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) गट-ब सरळसेवा या पदावर सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-१५ (रुपये ४१८००-१३२३००) मध्ये ते ज्या दिवशी रुजू होतील त्या दिनांकापासून त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गामध्ये विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे.

२. परिशिष्ट-अ येथील उमेदवारांना महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम, २०२१ मधील तरतुदी लागू राहतील.

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.परिवी-२७१५/प्र.क्र.३०२/कार्या.८, दि.२२.०६.२०२१ मधील तरतुदीनुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) गट-ब सरळसेवा" या पदावरील उमेदवारांना दोन वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी लागू राहील. सदर कालावधीत उमेदवार परिवीक्षा धोरणानुसार शासकीय कामकाज करण्यास सक्षम नसल्याचे सिध्द झाल्यास त्यांची प्राधिकरणातील सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल. उमेदवारांची नियुक्ती ही दोन वर्षाचा परिवीक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करण्याच्या व खालील विहित अटी/शर्तीच्या अधीन राहिल :-

(१) सदर उमेदवारांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर नियुक्तीने देण्यात आलेली पदस्थापना ही अंतिम असून त्यात बदल होणार नाही.

(२) परिशिष्ट-अ मधील परिवीक्षाधीन उमेदवारांनी त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या सविस्तर पदस्थापनेच्या ठिकाणी आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत तात्काळ रुजू व्हावे. सदर विहित कालावधीत उमेदवार रुजू झाला/झाली नाही तर तो/ती नोकरीची संधी गमावेल व तो/ती वरील पदावरील नियुक्ती स्विकारण्यास इच्छूक नाहीत, असे गृहीत धरण्यात येईल व त्यांचे नियुक्तीचे आदेश आपोआप रद्द होतील. सदर उमेदवारांचा नियुक्तीकरीता कोणत्याही परिस्थितीत विचार करण्यात येणार नाही.

(३) सर्व मुख्य अभियंता/सर्व अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदर उमेदवारांच्या रुजू दिनांकाबाबतचा अहवाल त्यांच्या रुजू अहवालाच्या प्रतीसह मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

(४) एखाद्या उमेदवारास विहित कालावधीत अपरिहार्य, उचित कारणास्तव त्यांना रुजू होण्यासाठी मुदतवाढ हवी असल्यास उमेदवारांनी सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना अर्ज सादर करावा. तद्नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात

घेतले जाणार नाहीत. उचित कारणास्तव विहित कालावधीत मुदतवाढीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना मुदतवाढ देण्याचा/नाकारण्याचा अंतिम निर्णय प्राधिकरणाचा राहील. रुजू होण्यास मुदतवाढ मिळालेले उमेदवार वगळता नियुक्तीच्या आदेशानुसार ३० दिवसांच्या आत रुजू न होणाऱ्या उमेदवारांना सेवा ज्येष्ठता गमवावी लागेल व त्यांची ज्येष्ठता ते ज्या दिनांकास प्राधिकरणाच्या सेवेत रुजू होतील, त्या दिनांकास निश्चित करण्यात येईल.

(५) मुदतवाढीसंदर्भात सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसुचना क्रमांक : एसआरव्ही २०१६/प्र.क्र.२८१/१२, दिनांक २१ जून, २०२१ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

४. सदर उमेदवारांना नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता देय असणार नाही.

५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.परिवी २७१५/प्र.क्र.३०२/कार्या.८, दिनांक २२.०६.२०२१ मधील तरतुदीनुसार परिशिष्ट-अ मधील उमेदवारांना परिवीक्षा कालावधीमध्ये कोणतीही वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही.

६. परिशिष्ट-अ येथील उमेदवारांनी मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसंदर्भात मराठी भाषा विभागाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविणे आवश्यक राहील.

७. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक ०७.०८.२००१ अन्वये शासन सेवेतील नियुक्तीकरिता संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान ही एक आवश्यक अर्हता निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९.०३.२००३ अन्वये आवश्यक प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जर त्यांनी विहित मुदतीत प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही तर उक्त कालावधी संपताच त्यांची सदर पदावरील सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल. तसेच, ज्यांना या बाबतीत सुट अनुज्ञेय आहे त्यांची प्रकरणे प्रचलीत शासन निर्णयानुसार संबंधित कार्यालय प्रमुखांनी तपासावीत.

८. मागास प्रवर्गाच्या राखीव पदावर (अ.जा., अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व.) शिफारस झालेल्या तसेच आरक्षित प्रवर्गातील असून देखील आयोगाने ज्यांची खुल्या प्रवर्गातून शिफारस केली आहे, अशा नियुक्ती दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास, त्यांनी या आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत जात प्रमाणपत्रांची वैधता, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. नियुक्ती देण्यात आलेल्या कार्यालयाने संबंधित मागासवर्गीय उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्रांच्या अनुषंगाने आवश्यक ती कागदपत्रे जात

प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठविण्याची कार्यवाही करावी. विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित उमेदवारांच्या सेवा प्रचलित नियमानुसार समाप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

९. इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाच्या शासन निर्णय क्रमांक :- सीबीसी-२०२०/प्र.क्र.१८/मावक, दि.३१.०१.२०२० मधील तरतूदीनुसार खुल्या प्रवर्गातील महिला, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील व्यक्ती, शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग आणि या प्रवर्गात समाविष्ठ मराठा समाज आणि आर्थिकदृष्टया दुर्बल घटक या प्रवर्गातील प्रगत व उन्नत गटात समाविष्ट नसलेल्या व्यक्तींना सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेल्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या NCL प्रमाणपत्राच्या वैधता पडताळणीसाठी राज्यातील प्रादेशिक महसूली विभाग स्तरावर "विभागीय आयुक्त" यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीकडून NCL प्रमाणपत्राची (उत्पन्नाच्या दाखल्याची) तपासणीअंती वैध ठरविण्याच्या अटीच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे.

१०. अनाथ प्रवर्गातून तसेच खेळाडू प्रवर्गातून शिफारसप्राप्त उमेदवारांना त्यांच्या अर्हता प्रमाणपत्रांच्या अनुकूल पडताळणी अहवालाच्या अधीन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

११. सर्व उमेदवारांनी रुजू होताना लहान कुटुंबाबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अनियो-१००५/१२६/सेवा-४, दि. ३१.१०.२००५ मधील तरतूदीनुसार परिशिष्ट-अ मधील उमेदवारांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होईल.

१३. परिशिष्ट-अ मधील उमेदवारांना महाराष्ट्र जीवन प्राणिकरणाच्या सेवेत रुजू झाल्यानंतर सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास, त्यांना शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०९२/१०३३/प्र. क्र.३३/९२/८, दिनांक २.१२.१९९७ मधील तरतुदीनुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास किमान १ (एक) महिन्याची आगाऊ नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक राहील. यासंदर्भातील राजीनामा स्विकारण्याचे अधिकार केवळ नियुक्ती प्राधिकारी म्हणजे मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना असतील. क्षेत्रिय कार्यालयांनी परस्पर उमेदवारांचा राजीनामा स्विकृत करु नये किंवा मंजूर करु नये. तथापि, राजीनामा दिल्यानंतर पुन्हा राजीनामा मागे घ्यावयाचा असल्यास, त्यांना वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो २०१९/प्र.क्र.४७०/सेवा-४, दिनांक ०९.०५.२०२२ मधील तरतूदी लागू राहतील.

मात्र, गैरवर्तणुक, सेवानियमांचा भंग इत्यादी कारणांसाठी एखाद्या उमेदवाराची सेवा समाप्त करण्यासाठी वरील प्रमाणे उमेदवारास नोटीस देण्याचे बंधन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर राहणार नाही.

१४. परिशिष्ट-अ मधील उमेदवारांनी महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण धोरणासंबंधी, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि.२३ सप्टेंबर, २०११ मधील परिच्छेद सहा येथील

तरतुदीनुसार प्रशिक्षण सुरु होण्यापूर्वी उमेदवाराने सक्षम प्राधिकाऱ्यास बंधपत्र लिहून द्यावे लागेल. जर एखादा उमेदवार त्यांच्या परिवीक्षाधीन कालावधीत नोकरी सोडत असेल तर प्रशिक्षणावर खर्च झालेली रक्कम उमेदवाराकडून वसूल करण्यात येईल. त्यानुसार प्रत्येक उमेदवाराला संचालक तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण व संशोधन संस्था (मीत्रा), नाशिक यांना व संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे बंधपत्र भरुन सादर करणे बंधनकारक राहील.

१५. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ च्या नियम क्र.११ मधील तरतूदीनुसार सदर तात्पुरती नियुक्ती ज्या उमेदवारांचे वैद्यकीय प्रमाणपत्र हा कार्यालयीन आदेश निर्गमित करण्याच्या दिनांकास अप्राप्त आहेत, अशा सोबतच्या परिशिष्ट 'अ' मधील अ.क्र. ११, २३, ३५ व ४२ या क्रमांकावरील उमेदवारांना वैद्यकीय मंडळाने शासकीय सेवेकरिता वैद्यकीय दृष्ट्या पात्र असल्याच्या अधीनतेने देण्यात येत आहेत. या क्रमांकावरील उमेदवारांनी नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत वैद्यकीय प्रमाणपत्र कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. सदर उमेदवारास वैद्यकीय मंडळाने शासकीय सेवेकरिता वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

उर्वरित उमेदवारांचे वैद्यकीय प्रमाणपत्र संबंधित वैद्यकीय मंडळांकडून प्राप्त झाले आहेत.

१६. परिशिष्ट-"अ" मधील उमेदवारांपैकी अ.क्र. ९ येथील उमेदवाराचा चारित्र्य व पुर्व चारित्र्य पडताळणी अहवाल संबंधित पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक कार्यालयांकडून अद्याप अप्राप्त आहे. या उमेदवाराची नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या दि.९ जानेवारी, २००९ व दि.२८ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयामधील, चारित्र्य व पुर्व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र नियुक्ती आदेशापासून सहा महिन्यांच्या आत प्राप्त होण्याच्या अधीन राहून करण्यात येत आहे. उमेदवाराने सादर केलेली माहिती असत्य असल्याचे आढळून आल्यास तात्पुरते नियुक्तीपत्र रद्दबादल करुन भारतीय दंड संहितेनुसार फौजदारी कारवाई तसेच प्राधिकरणाच्या सेवेत कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल. ६ महिन्यांच्या आत चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त न झाल्यास सदर उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. तसेच, अहवाल असमाधानकारक असल्यास त्याची नियुक्ती कोणतेही कारण न देता १ महिन्याची नोटीस देऊन समाप्त करण्यात येईल.

उर्वरित उमेदवारांचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य अहवाल संबंधित पोलिस आयुक्त/अधीक्षक कार्यालयाकडून प्राप्त झाले आहेत.

१७. संबंधित कार्यालय प्रमुख यांनी त्यांचे कार्यालयात रुजु होण्यासाठी येणा-या उमेदवारांची सर्व संबंधित मुळ प्रमाणपत्रे तपासून खात्री करावी व मगच उमेदवारांना नियुक्तीच्या ठिकाणी रुजु करुन घ्यावे व त्यांचा रुजू झाल्याच्या अहवाल मध्यवर्ती कार्यालयास तात्काळ सादर करावा.

१८. विहित कालावधीत रुजू न झालेल्या परिशिष्ट-अ मधील उमेदवारांचा अहवाल संबंधित मुख्य अभियंता/ अधीक्षक अभियंता किंवा कार्यालय प्रमुख यांनी मध्यवर्ती कार्यालयास पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा.

१९. **परिशिष्ट-"अ"** मधील नियुक्ती करणेत आलेल्या उमेदवारांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या बाहेरील शासकीय/ निमशासकीय कार्यालयात प्रतिनियुक्ती दिल्यास, ती त्यांना स्विकारणे बंधनकारक राहील.

२०. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.परिवी २७१५/प्र.क्र.३०२/कार्या.८, दिनांक २२.०६.२०२१ मध्ये नमुद केल्यानुसार, परिशिष्ट-अ मधील उमेदवार ज्या दिवशी रुजू होतील, त्या दिवसापासून नियमाप्रमाणे त्यांचे कार्यमुल्यमापन अहवाल लिहिण्यात यावेत व बदली झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्याकडे पाठवून विभाग प्रमुखांनी याबाबत संबंधित मुख्य अभियंता/ अधीक्षक अभियंता व मध्यवर्ती कार्यालयास कळवावे.

२१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.परिवी २७१५/प्र.क्र.३०२/कार्या.८, दिनांक २२.०६.२०२१ मध्ये नमुद केल्यानुसार परिवीक्षाधीन कालावधीत रजेच्या तरतुदी लागू होतील.

२२. परिशिष्ट-अ येथील उमेदवार जर शासनाच्या इतर विभागात काम करीत असतील तर संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी त्यांना नेमणूकीचे ठिकाणी हजर होण्याच्या दृष्टीने सदर सेवेतून कार्यमुक्त झाल्याचे अथवा तसे लेखी पत्र संबंधित मुख्य अभियंता/ अधीक्षक अभियंता किंवा कार्यालय प्रमुख यांना सादर केल्याशिवाय त्यांना रुजू करुन घेता येणार नाही.

२३. परिशिष्ट-अ येथील जे उमेदवार सेवेत रुजू होतील त्यांचे बाबतचा एकत्रित अहवाल तसेच जे रुजू होणार नाहीत त्यांचा गोषवारा व उमेदवारांकडून घेतलेले बंधपत्र एकत्रितरीत्या संबंधीत कार्यालयाने तात्काळ मध्यवर्ती कार्यालयास सादर करावे.

२४. तसेच प्रशिक्षणादरम्यान सर्व उमेदवारांकडून महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मित्रा), नाशिक या संस्थेच्या प्रशिक्षणाबाबतच्या नियमांचे व शिस्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. त्यांच्याकडून नियमभंग झाल्यास संचालक तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण व संशोधन संस्था (मीत्रा), नाशिक यांचेकडून संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

२५. परिशिष्ट-अ येथील उमेदवारांनी सहाय्यक अभियंता श्रेणी-२ पदासाठी आवश्यक असलेली व्यावसायिक परीक्षा रुजू झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षाचे आत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. विहित कालावधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास किंवा कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास किंवा त्यांचे काम योग्य अथवा अनुरुप न आढळल्यास त्यांची नियुक्ती कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्यात येईल.

२६. नियुक्ती देण्यात येत असलेल्या उमेदवारांनी नियुक्तीच्या/पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न होता विशिष्ट ठिकाणी पदस्थापना/नियुक्ती मिळविण्यासाठी मा.लोकप्रतिनिधी/ खाजगी व्यक्ती किंवा संघटना यांचे मार्फत दडपण/ दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास, संबंधित उमेदवारांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतुदींनुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.

मान्यतेने.

(गजानन गुरव )
मुख्य प्रशासकीय अधिकारी

**प्रत माहितीसाठी सादर.**

- मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
- मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा उपाध्यक्षा, म.जी.प्रा. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
- मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
- मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई
- मा.अभियान संचालक, जल जीवन मिशन, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.
- मा.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :**

- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन (दक्षिण कक्ष), नवी मुंबई.
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/नागपूर.
- अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा.गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथक, सिडाको भवन, नवी मुंबई
- अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा.म.नि.सं.व सं.कक्ष, सिडको भवन, नवी मुंबई
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे/ पनवेल/पुणे/सांगली/नाशिक/ जळगाव/ अहिल्यानगर/छत्रपती संभाजीनगर/लातूर/नांदेड/अमरावती/अकोला/नागपूर/चंद्रपूर.

  क्षेत्रीय स्तरावरील प्रशिक्षण अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संशोधन व प्रशिक्षण केंद्र, नाशिक यांच्या मार्गदर्शनानुसार देण्यात यावे.
- **संचालक (प्रशासन) तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण व संशोधन संस्था (मीत्रा), शासकीय पाणी पुरवठा केंद्राच्या आवारात, आय.एस.पी. रोड., डिस्टलरी इस्टेट, नाशिक रोड.**
- उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग/ जलव्यवस्थापन विभाग, ---------------
- अवर सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
- अवर सचिव, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.
- उप अभियंता, आय टी सेल, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.
- उप अभियंता, म.जी.प्रा.स्थावर मालमत्ता आ-९, सिडको भवन,नवी मुंबई
- संबंधित उमेदवार (रजिस्टर पोस्टाने)
- कार्यालयीन आदेश धारिका.

कार्यालयीन आदेश क्र. -म.जी.प्रा.-२०२५/प्र.क्र.३५/आ-६, दिनांक २७/०२/२०२६ सोबतचे

**"परिशिष्ट-अ"**

सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) गट-ब (सरळसेवा) पदावर नियुक्तीने पदस्थापना

| अ.क्र. | सहाय्यक अभियंता श्रेणी-२ यांचे नांव | उमेदवाराचा मुळ प्रवर्ग | म.लो.आ. शिफारस प्रवर्ग | अंतिम महसूल विभाग वाटप | नियुक्तीसाठी पदस्थापनेच्या कार्यालयाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.सचिन सुनिल नायर | अराखीव | खुला | पुणे | म.जी.प्रा. उपविभाग, इचलकरंजी |
| २ | श्री.यादव हृतिक राजेंद्र | अराखीव | खुला | कोकण-१ | म.जी.प्रा.उपविभाग क्र.१, विरार |
| ३ | श्री.प्रणय संजय चंद्रात्रे | अराखीव | खुला | नाशिक | म.जी.प्रा. उपविभाग, भुसावळ |
| ४ | श्री.ठोंबरे शिवराज भालचंद्र | अराखीव | खुला | पुणे | म.जी.प्रा. उपविभाग, विटा |
| ५ | श्री.अडचुले ओम विजय | अराखीव | खुला | अमरावती | म.जी.प्रा. जव्य उपविभाग, क्र.१, यवतमाळ |
| ६ | श्री.साळुंखे सागर भारत | अराखीव | खुला | पुणे | म.जी.प्रा. उपविभाग, तासगांव |
| ७ | श्री.यादव दिपेश प्रमोद | अराखीव | खुला | कोकण-२ | म.जी.प्रा म.नि.सं.सं. कक्ष,सिडको भवन, नवी मुंबई |
| ८ | श्री.ढेले प्रसाद विनायकराव | अराखीव | खुला | छत्रपती संभाजीनगर | म.जी.प्रा. उपविभाग, मंठा |
| ९ | पाटील अक्षय अमर | अराखीव | खुला | पुणे | म.जी.प्रा. उपविभाग, वडूज |
| १० | श्री.विचारे सौरभ प्रविण | अराखीव | खुला | कोकण-२ | जल जीवन मिशन बेलापूर, नवी मुंबई |
| ११ | श्री.बैस अजय नंदकिशोर | अराखीव | खुला | अमरावती | म.जी.प्रा. उपविभाग, बुलढाणा |
| १२ | श्री.पंकज गुप्ता | अराखीव | खुला | अमरावती | म.जी.प्रा. उपविभाग, पुसद |
| १३ | श्री.आकाश भरत नागणे | आ.दु.घ. | आ.दु.घ. | पुणे | म.जी.प्रा. उपविभाग क्र.२, सोलापूर |
| १४ | श्रीमती गढरी पुजा गणेश | भ.ज.क. (महिला) | खुला (महिला) | कोकण-२ | म.जी.प्रा. उपविभाग क्र.२, ठाणे |
| १५ | श्री.राजु गंजीधर ठेंग | आ.दु.घ. | आ.दु.घ. | पुणे | म.जी.प्रा. उपविभाग, इस्लामपूर |
| १६ | श्रीमती चौगुले सोनाली गुरुलिंग | अराखीव (महिला) | खुला (महिला) | पुणे | म.जी.प्रा. उपविभाग, फलटण |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७ | श्रीमती ऐश्वर्या रामचंद्र सोनुरे | भ.ज.क. (महिला) | खुला (महिला) | कोकण-१ | म.जी.प्रा. उपविभाग, चिपळूण |
| १८ | श्रीमती शिंदे रोहिणी बाबूराव | अराखीव (महिला) | खुला (महिला) | पुणे | म.जी.प्रा. उपविभाग क्र.६, कोल्हापूर |
| १९ | श्रीमती धनलक्ष्मी बळवंत ढोणे | भ.ज.क. (महिला) | खुला (महिला) | कोकण-१ | म.जी.प्रा.उपविभाग, सावंतवाडी, जि.सिंधुदुर्गनगरी |
| २० | श्रीमती कोकाटे स्नेहल जालंदर | अराखीव (महिला) | खुला (महिला) | नागपुर | म.जी.प्रा. उपविभाग, वर्धा |
| २१ | श्री.सौरभ चंद्रपुरी गोसावी | भ.ज.ब. | भ.ज.ब. | कोकण-२ | म.जी.प्रा म.नि.सं.सं. कक्ष,सिडको भवन, नवी मुंबई |
| २२ | श्रीमती गवाणकर प्राजक्ता राजाराम | आ.दु.घ. (महिला) | आ.दु.घ. (महिला) | कोकण-१ | म.जी.प्रा. विभाग, सिंधुदुर्ग |
| २३ | श्री.ओंकार दत्तात्रय झुंजकर | वि.मा.प्र. | वि.मा.प्र. | छत्रपती संभाजीनगर | म.जी.प्रा. उपविभाग क्र.३, छत्रपती संभाजीनगर |
| २४ | श्रीमती सरिता विठ्ठल पवार | आ.दु.घ. (महिला) | आ.दु.घ. (महिला) | छत्रपती संभाजीनगर | म.जी.प्रा. विभाग, नांदेड |
| २५ | श्री.राठोड पीयूष गणेश | वि.जा.अ. | वि.जा.अ. | अमरावती | म.जी.प्रा. जव्य उपविभाग, दर्यापूर |
| २६ | श्रीमती खंडागळे प्रीती रमेश | अ.जा. (महिला) | अ.जा. (महिला) | कोकण-२ | म.जी.प्रा. गु. प. व द. प., सिडको भवन,नवी मुंबई |
| २७ | श्रीमती पाटोळे मनिषा बबन | अ.जा. (महिला) | अ.जा. (महिला) | छत्रपती संभाजीनगर | म.जी.प्रा. उपविभाग क्र.१, परतूर |
| २८ | श्रीमती वैष्णवी विष्णू झोंबाडे | अ.जा. (महिला) | अ.जा. (महिला) | अमरावती | म.जी.प्रा.उपविभाग, देऊळगांवराजा |
| २९ | श्री.राहुल सिध्दार्थ वानखेडे | अ.जा. | अ.जा. | छत्रपती संभाजीनगर | म.जी.प्रा. उपविभाग क्र.४, छत्रपती संभाजीनगर |
| ३० | श्री.ऋषिकेश दिलीपराव पाईकराव | अ.जा. | अ.जा. | छत्रपती संभाजीनगर | म.जी.प्रा.उपविभाग, हिंगोली |
| ३१ | श्री.कोकणे आकाश पांडुरंग | अ.जा. | अ.जा. | छत्रपती संभाजीनगर | म.जी.प्रा. विभाग, लातूर |
| ३२ | श्री.मेश्राम अमोघ शशिकांत | अ.जा. | अ.जा. | अमरावती | म.जी.प्रा. उपविभाग क्र.२, अमरावती |
| ३३ | श्रीमती अंबिका अशोक डमरे | अ.जा. (महिला) | अ.जा. | नाशिक | म.जी.प्रा. उपविभाग, अकोले जि.अहिल्यानगर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३४ | श्रीमती मद्रासी मंजुषा जितेंद्र | अ.जा. (महिला) | अ.जा. (खेळाडू) | अमरावती | म.जी.प्रा. जव्य उपविभाग, जळगांव, जामोद |
| ३५ | श्रीमती गायत्री कनिराम पवार | वि.जा.अ. (महिला) | वि.जा.अ. (महिला) | छत्रपती संभाजीनगर | म.जी.प्रा. उपविभाग, परभणी |
| ३६ | श्री.हागवणे संतोष रावजी | अ.ज. | अ.ज. | छत्रपती संभाजीनगर | म.जी.प्रा. उपविभाग, धाराशिव |
| ३७ | श्री.नाईक सात्विक संजय | अ.ज. | अ.ज. | नाशिक | म.जी.प्रा. उपविभाग, संगमनेर |
| ३८ | श्री.सुश्याम रमेश वळवी | अ.ज. | अ.ज. | नाशिक | म.जी.प्रा उपविभाग, मालेगांव |
| ३९ | श्री.शुभम देविदास सोयाम | अ.ज. | अ.ज. | नागपुर | म.जी.प्रा. उपविभाग क्र.३, गोंदिया |
| ४० | श्री.मडावी केदार देविदास | अ.ज. | अ.ज. | नागपुर | म.जी.प्रा. विभाग, चंद्रपूर |
| ४१ | श्री.पवार पराग युवराज | अ.ज. | अ.ज. | नाशिक | म.जी.प्रा. उपविभाग, अहिल्यानगर |
| ४२ | श्रीमती बागुल धनश्री रमेश | अ.ज. (महिला) | अ.ज. (महिला) | छत्रपती संभाजीनगर | म.जी.प्रा. उपविभाग, वैजापूर |
| ४३ | श्रीमती खातिजा बानो शेख रहिम | अराखीव (महिला) (दिव्यांग) | आ.दु.घ. (दिव्यांग) | नाशिक- (दिव्यांग) (सुट) | म.जी.प्रा. मंडळ, जळगांव |
| ४४ | श्री.देशमुख महेश अजय | अराखीव (खेळाडू) | खुला (खेळाडू) | छत्रपती संभाजीनगर | म.जी.प्रा.उपविभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर |
| ४५ | श्री.बाविस्कर विनय कपुरचंद | इ.मा.व. (दिव्यांग) | इ.मा.व. (दिव्यांग) | नाशिक- (दिव्यांग) (सुट) | म.जी.प्रा. विभाग, नाशिक |

(गजानन गुरव )
मुख्य प्रशासकीय अधिकारी